**MHAU030212172022**

## म.कौ.हिं.सं.का. अर्ज क्र.८२३/२०२२

## निशाणी ५ खाली आदेश.

०१. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये दाखल केला असून कलम २३ अन्वये दरमहा १०,०००/– रुपये अंतरीम पोटगी देण्याची विनंती केली आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदाराचे लग्न गैरअर्जदार यांच्या सोबत दिनांक १६/०५/२०१७ रोजी औरंगाबाद येथे अर्जदाराचे आई वडीलांच्या घरी मुस्लीम धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाले. गैरअर्जदार यांचे वडील नसल्याकारणामुळे गैरअर्जदाराचे नातेवाईक नामे शब्बीर शहा व निशार शहा यांच्या मध्यस्थी व बोलण्यावरून अर्जदारांच्या आई वडीलांनी अर्जदाराचे लग्न चांगल्या पध्दतीने लावुन दिले. लग्नामध्ये अर्जदाराच्या आई वडीलांनी जवळपास दिड लाख रुपये खर्च केला व ५० हजार रूपये नवीन मोटारसायकल खरेदी करण्यासाठी सर्व नातेवाईक व मध्यस्थी समक्ष गैरअर्जदाराला दिले. गैरअर्जदाराने नंतर मोटरसायकल खरेदी केली. अर्जदार व गैरअर्जदाराचे लग्न झाल्यापासून आजपावेतो पती–पत्नीचे नातेसंबंध कायम आहेत.

०३. अर्जदाराचे पुढे असे कथन की, गैरअर्जदाराने अर्जदारास लग्न झाल्यापासून ६ ते ७ महिने चांगले नोंदवले, त्यानंतर शुल्लक कारणावरून, छोट्या छोट्या गोष्टीवरून अर्जदारास त्रास देण्यास सुरवात केली व तिला धमकवत असे की, तुला तुझ्या आई वडीलांकडे सोडून येतो. अर्जदाराच्या वडीलांनी घेवुन दिलेल्या नविन मोटरसायकलवर गैरअर्जदार अर्जदारास माहेरी घेवुन जायचा, गावाच्या अलीकडील विहीरजवळ गाडी थांबवुन सांगत असे की, तु मला आजिबात अवडत नाही, तुझा मोबाईल दाखव, तुझ्या मोबाईलवर कोणाकोणाचे फोन येतात ते मला बघु दे, नसता तुला याच विहीरीवरून पाण्यात ढकलुन मारून टाकीन, अशा धमक्यामुळे अर्जदार, गैरअर्जदाराच्या सांगण्याप्रमाणे वागत असे.

०४. अर्जदाराचे पुढे असे कथन की, अर्जदार हिस गैरअर्जदाराने दिनांक ०९/

११/२०२२ रोजी शिवीगाळ करून एका कपड्यानिशी तिच्या माहेरी आणून सोडले आहे, तेव्हापासून अर्जदार ही आपल्या आई वडीलांकडे त्यांच्या दयेवर जिवन जगत असून ती गैरअर्जदारापासून विभक्त राहत आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास दिलेले आहे. अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी पूर्णतः दुर्लक्षीत केलेले असून आतापर्यंत त्यांच्याकडे ढुमकुनही पाहिलेले नाही, त्यामुळे अर्जदार ही हालाखीचे व अश्रितप्रमाणे जिवन जगत आहे.

०५. अर्जदाराचे पुढे असे कथन की, गैरअर्जदार यांचे बकरा मटन शॉप असून या व्यवसायातून त्यांना दरमहा ७०,०००/– रूपये मिळतात. तसेच गैरअर्जदाराचे यांचे स्वतःचे घर आहे. तसेच गैरअर्जदारास वडीलोपार्जित शेती १ एकर ६ गुंठे जमीन असून त्या पासून त्याला जवळपास वार्षिक १२ ते १५ लाख उत्पन्न मिळते. तसेच अर्जदाराच्य व्यतिरीक्त गैरअर्जदारावर इतर कोणीही अवलंबुन नाही, त्यामुळे गैरअर्जदार अर्जदारास सहज अंतरीम पोटगी देऊ शकतो. गैरअर्जदार याने अर्जदार हिला अत्तापर्यंत खाणे–पिणे, कपडा दवाखाना व दैनंदिन मुलभुत गरजा इत्यादी खर्च दिलेला नाही. गैरअर्जदार यांचेवर अर्जदारांशिवाय इतर कोणीही अवलंबून नाही म्हणून गैरअर्जदार हा अर्जदार हिला दरमहा १०,०००/– पोटगी प्रित्यर्थ देण्यास समर्थ आहे व त्याची तशी ऐपत देखील आहे. सबब, अर्जदाराने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०६. गैरअर्जदाराने नि.११ अन्वये म्हणणे दाखल केले. गैरअर्जदाराने अर्जदारासोबतचे नातेसंबंध व अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असल्याचे मान्य केले आहे व वैक्लपिकरित्या कथन केले आहे की, गैरअर्जदार याने नविन मोटारसायकल खरेदी केली परंतु सदरील गाडी ही गैरअर्जदार यांनी स्वतःच्या पैशातुन खरेदी केलेली आहे. उलट अर्जदार हिचेच लग्नाच्या अगोदर दुसऱ्या मुलासोबत अनैतिक संबंध होते, तरी देखील गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला समजावुन सांगितले व व्यवस्थित संसार करण्याची समज दिली. अर्जदार ही सतत फोनवर बोलत असे, त्यावर गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला अनेक वेळा समजावुन सांगितले परंतु अर्जदार हिच्या स्वभावात काही एक बदल झाला नाही. उलट अर्जदार ही घरातील सर्व कामे सोडुन रूममध्ये स्वतःला कोंडुन घेत असे व तासतास फोनवर बोलत असे.

०७. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन की, अर्जदार ही तिची चुक झाकण्याकरीता तसेच गैरअर्जदार याला दबावात ठेवण्याकरीता सतत गैरअर्जदारावर संशय घेत असे व बळजबरीने त्याचा मोबाईल तपासत असे. गैरअर्जदार याने अर्जदार हिला बऱ्याच वेळा सांगितले की, माझे कोणासोबत काहीही संबंध नाही परंत अर्जदार ही गैरअर्जदार यांचे काही एक ऐकण्याच्या मनस्थितीत नसे.

०८. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन की, दिनांक १५/११/२०२० रोजी अर्जदारहिने घरातील किरकोळ कारणावरून वाद केला व तिला माहेरी जायचे असल्याने तिने तिच्या आई वडीलांना गैरअर्जदार यांच्याविरुद्ध एकाचे दोन सांगुन माहेरी घेवुन जाण्यास सांगितले. उलट अर्जदाराच्या आई वडीलांनी गैरअर्जदार व त्यांच्या नातेवाईकांना शिवीगाळ केली व अर्जदार हिला माहेरी घेवुन गेले. अर्जदार हिने गैरअर्जदार याला खोटा मजकुर नमुद करून कायदेशीर नोटीस पाठविली. त्यामध्ये अर्जदार हिने गैरअर्जदार याच्याकडे नांदण्यास जाण्यासाठी दिखावा करत नोटीस पाठविली. गैरअर्जदाराने अर्जदार हिला गावातील प्रतिष्ठीत लोकांसमोर नांदण्यास आणले परंतु अर्जदार ही नांदण्यास आल्यानंतर गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांना या ना त्या प्रकारे मानसिक त्रास देत होती म्हणत असे की, मला तुमच्यासोबत संसार करावयाचा नाही, माझे दुसऱ्या मुलावर प्रेम आहे. मला त्याच्याशी लग्न करावयाचे होते. परंतु माझ्या आई वडीलांनी तुझ्याशी बळजबरीने लग्न लावुन दिले आहे. त्यामुळे मला तुझ्यासोबत संसार करावयाचा नाही असे म्हणुन गैरअर्जदारासोबत कडाक्याचे भाडण केले आणि माहेरी निघुन गेली.

०९. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन की, गैरअर्जदाराने कोणत्याही प्रकार अर्जदार हिला कधीही स्वतः हुन माहेरी हाकलुन दिले नाही. उलटपक्षी अर्जदार हिनेच गैरअर्जदार याच्यासोबत घरातील किरकोळ कारणावरून वाद करत होती व माहेरी निघुन जात होती. अर्जदार हिला गैरअर्जदारासोबत संसार करण्याची अजिबात इच्छा नव्हती. गैरअर्जदार याने

अर्जदार हिचा कधीही शारिरीक व मानसिक छळ केलेला नाही. अर्जदार हिने गैरअर्जदार याच्यावर खोटे आरोप करून सदरील अर्ज दाखल केलेला आहे.

१०. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन की, गैरअर्जदाराचे मटन शॉप आहे परंतु त्याला महिन्याला खर्च वजा जाता ७ ते ८ हजार रूपये उत्पन्न मिळते. त्यामध्ये गैरअर्जदाराला स्वतःचा व बहिण आणि आईचा खर्च करावा लागतो. तसेच  गैरअर्जदार याची शेत पडीक असुन त्यापासुन देखील त्याला काही एक उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदार हिला पोटगी देण्यास सक्षम नाही.

११. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन की, गैरअर्जदाराने अर्जदार हिला कधीही मारहाण केली नाही. दिनांक ०९/११/२०२२ रोजी स्वतः गैरअर्जदार सोबत भांडण करून आपले कपडेलत्ते घेवुन आपल्या माहेरी निघुन गेलेली आहे. त्यानंतर गैरअर्जदार याने अर्जदार हिला अनेक वेळा नांदण्यास घेवून येण्याची विनंती केली परंतु अर्जदारहिने गैरअर्जदारासोबत नादण्यास स्पष्ट नकार दिला व गैरअर्जदाराच्या विरुद्ध खोटे आरोप करून सदरील अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार ही फक्त आणि फक्त गैरअर्जदाराला त्रास व्हावा, या हेतुने अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या विरोधात सदरील प्रकरण दाखल केले आहे. अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदाराने कोणत्याही प्रकारचा छळ किंवा शारीरिक मानसिक त्रास अर्जदारास दिलेला नाही. याउलट गैरअर्जदार हा या सर्व प्रकारामुळे त्रस्त झालेला आहे व निराश झाला असुन त्याला आता जगण्याची सुखी जीवनाची कल्पनाच नकोशी झाली आहे.

१२. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन की, अर्जदार ही स्वतःच गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबियांना आर्थिक व मानसिक त्रास देवुन निघुन गेलेली आहे. अर्जदार हिने वेळोवळी तीला नांदायचे नाही व जबरदस्ती केल्यास आत्महत्या करण्याची धमकी गैरअर्जदाराला सर्व पाहुणे मंडळीसमोर दिलेली आहे. तेव्हा अर्जदार ही पोटगी मागण्यास पात्र नाही. गैरअर्जदार याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१३. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार यांनी कौटुंबिक नातेसंबंध मान्य केले असल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे मान्य होते. वास्तविक पाहता अर्जदार हिच्या कथनानुसार दि.०९.११.२०२२ रोजी तिला शिवीगाळ करुन गैरअर्जदार याने घराबाहेर हाकलुन दिले आहे. अर्जदार हिने ३ वेळा गैरअर्जदार याला नोटीस पाठवुन नांदायला घेऊन जाण्याबाबत सांगितले. गैरअर्जदार याचे म्हणणे विचारात घेता गैरअर्जदाराने म्हण्ण्यामध्ये अर्जदार हिच्यावरती जे अनैतिक संबंध असल्याचे कथन केले आहे परंतु, अर्जदाराचे कोणाशी अनैतिक संबंध आहे किंवा कसे याबाबत स्प्ष्टोकती केलेली नाही. यावरुन अर्जदार हिचा हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार हिला तथाकथीत घरातुन बाहेर काढल्यानंतर कोणत्याही प्रकारची पुर्तता केल्याचे गैरअर्जदार याचे म्हणणे नाही किंवा तसे दिसुन येत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी कलम ३ अन्वये अर्जदार यांचा आर्थिक हिंसाचार झाल्याचे देखील दिसुन येते. गैरअर्जदार याने तो मटन शॉप चालवत असल्याचे मान्य केले आहे व त्याला कर्ज वगैरे जाऊन ७ ते ८ हजार उत्पन्न मिळत असल्याचे मान्य केले आहे. परंतु, त्याला कर्ज किती व त्याचा हफ्ता किती याबाबतची स्पष्टोक्ती गैरअर्जदार याने केली नाही.

१४. गैरअर्जदाराकडे असलेला उत्पन्नाचा स्त्रोताचा विचार करता अर्जदार हिला अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा रु.३,०००/- अंतरिम आर्थिक अनुतोष देणे योग्य व उचित वाटते. त्यामूळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. गैरअर्जदार याने अर्जदार हिला अर्ज दाखल केलेपासून म्हणजे दिनांक २६/१२/२०२२ पासून दरमहा ३,०००/- अंतरीम आर्थिक अनुतोष अर्ज निकाली लागेपर्यंत देण्यात यावा.

२. आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत द्यावी.

Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2023.10.30 17:30:56 +0530

औरंगाबाद (रविकिरण सपाटे)

दिनांक- ३०/१०/२०२३ ९ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एस.एम. शेख, |
| न्यायालयाचे नाव | : | ९ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी |
| आदेशाची तारीख | : | ३०.१०.२०२३ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ३०.१०.२०२३ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ३०.१०.२०२३ |